**INTERNATIONAL LEPROSY UNION-HEALTH ALLIANCE**
C/o. CASP BHAVAN : Survey No. 132/2, Plot No. 3, Pashan Baner Link Road,
Pune 411 021. INDIA Tel. : 32317932
E-mail : ilupune@gmail.com Website : www.ilu.org.in

Hon. Justice **Chandrashekhar Dharmadhikari,** (Retd.) Patron | **Mr. Ram Naik** President | **Dr. S. D. Gokhale** Hon. President

**Mr. R. H. Belavadi** Vice - President | **Maj. Dr. Pradip Gaikwad** Ex-Director | **Dr. Dilip Satbhai** Hon. Treasurer | **Mrs. R. S. Gokhale** Hon. Secretary

**कृपया प्रसिध्दीसाठी -** **15 जानेवारी 2013**

## आंतरराष्ट्रीय कुष्ठपीडित संघटनेचे डॉ. शरद्चंद्र गोखले यांचे निधन

**पुणे, मंगळवार :** आंतरराष्ट्रीय कुष्ठपीडित संघटनेचे (इंटरनॅशनल लेप्रसी युनियन) मानद् अध्यक्ष डॉ. शरद्चंद्र गोखले यांचे आज पुणे येथे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते. डॉ. गोखले यांच्या पश्चात पत्नी, मुलगा डॉ. संजीव, कन्या व अन्य कुटुंबिय आहेत.

कुष्ठपीडितांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या सामाजिक पुनर्वसनासाठी आयुष्यभर कार्यरत डॉ. शरद्चंद्र गोखले हे साहित्यिक-पत्रकार म्हणूनही प्रसिद्ध होते. 'युनो' वर भारताचे प्रतिनिधीत्व केलेल्या डॉ. गोखले यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी तसेच मुलांच्या आहार, शिक्षणासाठी भरीव कार्य केले होते. 'केसरी' चे संपादक पद भूषविलेले डॉ. गोखले यांनी अलिकडेच कुष्ठपीडितांच्या सामाजिक पुनर्वसनासाठी मानवी हक्क संरक्षण कायद्याचा आधार घेऊन देशभर मोहीम सुरु केली होती.

डॉ. गोखले यांच्या पुढाकाराने अलिकडेच आंतरराष्ट्रीय कुष्ठपीडित संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी डॉ.गोखले यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. श्री. नाईक म्हणाले,''देशभरातील कुष्ठपीडितांच्या सशक्तीकरणासाठी प्रयत्न हीच डॉ. गोखले यांनी खरी श्रद्धांजली ठरेल. आज मात्र या सर्व कुष्ठपीडितांना पोरके झाल्यासारखे वाटत असेल.''

**(कार्यालय सचिव)**

**9867493399**

**टीप: छायाचित्र ईमेलने पाठवित आहोत.**